ONIDA
OWNER'S PRIDE

**October 24, 2026** **Ref. No. 52/2026-2027**

| To, | To, |
|---|---|
| BSE Limited | National Stock Exchange of India Limited |
| 25th Floor, P.J. Towers, Dalal Street, | Exchange Plaza, Bandra Kurla Complex, |
| Mumbai-400 001 | Bandra (East), Mumbai- 400 051 |
| Scrip Code: 500279 | Symbol: ONIDA |

**Sub: Newspaper Advertisement regarding opening of a Special Window for Transfer and Dematerialisation of physical securities**

Respected Sir/Madam,

Pursuant to Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and in accordance with SEBI Circular No. HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/I/3750/2026 dated January 30, 2026, please find enclosed copies of newspaper advertisements published today i.e. Saturday, October 24, 2026 in Free Press Journal (English Newspaper) and Navshakti (Marathi Newspaper), regarding the intimation to the Members about the opening of a special window to facilitate transfer and dematerialisation of physical securities which were sold/purchased prior to April 01, 2019.

**You are requested to kindly take the same on record.**

**Thanking You.**

**for Onida Electronics Limited**
**(Formerly known as MIRC Electronics Limited)**

VIJAY JAIKRISHIN MANSUKHANI
Digitally signed by VIJAY JAIKRISHIN MANSUKHANI
Date: 2026.10.24 11:31:06 +05'30'

**Vijay Mansukhani**
**Chairman and Managing Director**
**DIN: 01041809**

Encl: - As above

# निवडणूक आयुक्तांच्या पत्रांवरून वाद

## कॅबिनेट सचिवालय आणि सीईसींच्या भूमिकेवर आरटीआयद्वारे मोठा खुलासा

**नवी दिल्ली :** निवडणूक आयोगातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला असून, वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त मनीष गर्ग यांनी आयुक्तांशी कोणतीही चर्चा न करता कामाचे वाटप केल्याचा आरोप करणाऱ्या दोन निवडणूक आयुक्तांच्या पत्रांच्या मुद्द्यावरून नवीन माहिती समोर आली आहे.

कॅबिनेट सचिवालयाने ही पत्रे कार्मिक आणि प्रशिक्षण विभागासोबतच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यालयालाही पाठवली होती, अशी माहिती माहितीच्या अधिकारातून (आरटीआय) उघड झाली आहे. याप्रकरणी निवृत्त कमोडोर लोकेश बात्रा यांनी माहिती अधिकारांतर्गत अर्ज दाखल केला होता, ज्याच्या उत्तरातून हे दस्तऐवज समोर आले आहेत.

समान आशयाची पत्रे

२९ जुलै रोजी निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांनी कॅबिनेट सचिव टी. व्ही. सोमनाथन यांना स्वतंत्र पण जवळपास समान आशयाची पत्रे पाठवली होती. वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त मनीष गर्ग यांनी २८ जुलै रोजी स्वतःसाठी आणि इतर अधिकाऱ्यांसाठी कामाचे वाटप करण्याचे आदेश काढले होते. मात्र, हे आदेश काढताना आयुक्तांशी कोणतीही चर्चा करण्यात आली नव्हती, असा आक्षेप या पत्रांत घेण्यात आला होता. मनीष गर्ग यांना प्रशासकीय विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आल्यानंतर काही तासांतच त्यांनी हा आदेश काढला होता, असेही यात म्हटले आहे.

सचिवालयाची भूमिका

आरटीआयद्वारे मिळालेल्या कागदपत्रांनुसार, ३ ऑगस्ट रोजी सचिवालयाने या पत्रांवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा अभिप्राय मागवण्याचा प्रस्ताव ठेवला होता. ४ ऑगस्ट रोजीच्या दुसऱ्या एका नोंदीत असे नमूद करण्यात आले होते की, ही पत्रे निवडणूक आयोगाचे औपचारिक कम्युनिकेशन नसून, दोन्ही आयुक्तांनी वैयक्तिक पातळीवर पाठवली आहेत. दोन्ही आयुक्तांना केवळ त्यांची पत्रे मिळाल्याची पोचपावती देण्यात आली. ५ ऑगस्ट रोजी पाठवलेल्या या पोचपावतीच्या प्रती कार्मिक विभागाचे सचिव, एस्टॅब्लिशमेंट ऑफिसर आणि मुख्य निवडणूक आयुक्तांचे मुख्य खाजगी सचिव यांना पाठवण्यात आल्या होत्या.

कॅबिनेट सचिवालयने आपल्या ४ ऑगस्ट रोजीच्या नोटमध्ये स्पष्ट केले होते की, असे कोणतेही पाऊल उचलले जाऊ नये ज्याचा अर्थ "घटनात्मक संस्थेत हस्तक्षेप" असा काढला जाऊ शकेल. तसेच, संबंधित अधिकारी मनीष गर्ग यांच्याबाबत भविष्यात घ्यावयाच्या निर्णयासाठी ही बाब कार्मिकच्या रेकॉर्डवर ठेवावी, अशी शिफारस सचिवालयाने केली होती.




### फाईल्सचा वाद

यापूर्वी ३ ऑक्टोबर रोजी एक वृत्तपत्राने म्हटले होते की, आयटी विभागाच्या (दुरुस्ती/फाइल रुटिंग) मुद्द्यावरून हा वाद केंद्रित होता. आयटी विभागाच्या महासंचालक सीमा खन्ना यांच्याकडील फाईल्सचे रुटिंग बदलण्याच्या गर्ग यांच्या निर्णयावर आयुक्तांनी आक्षेप घेतला होता. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर निवडणूक आयोगाकडून अद्याप कोणतीही मोठी प्रतिक्रिया आलेली नाही, परंतु या आरटीआयमुळे निवडणूक आयोगातील अंतर्गत घडामोडी पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत.

# नेहा बोरा यांची याचिका फेटाळली

**नवी दिल्ली :** अखिल भारतीय विद्यार्थी असोसिएशनच्या (एआयएसए) अध्यक्षा नेहा बोरा यांना पोलिसांच्या वतीने शांततेचा बॉण्ड सादर करण्यासंदर्भात बजावण्यात आलेल्या नोटीसला आव्हान देणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.

विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांसमोर चालणाऱ्या सुनावणीदरम्यान नेहा बोरा यांना सर्व आवश्यक कागदपत्रे आणि साहित्य पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणात पुरेशा सुरक्षेची काळजी घेण्यात आली असून दंडाधिकाऱ्यांना योग्य ते निर्देश देण्यात आले आहेत, असे न्यायमूर्तींनी नमूद केले.

# प्रवासी दोन लाख, पैसे मात्र ३० लाखांच्या हिशेबाने

## 'चलो ॲप'च्या व्यवहारांच्या चौकशीची मागणी

**मुंबई :** बेस्ट उपक्रमाच्या बसमधून दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी सुरू करण्यात आलेल्या 'चलो ॲप'च्या आर्थिक व्यवहारांवरून आता प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दररोज सुमारे २२ लाख प्रवासी बेस्ट बसने प्रवास करत असताना केवळ दोन लाख प्रवासी या ॲपचा वापर करतात. मात्र, ॲप कंपनीला देण्यात येणाऱ्या देयकांची गणना ३० लाख प्रवाशांच्या आधारे होत असल्याचा आरोप बेस्ट समितीचे सदस्य अजय सिंह यांनी केला आहे. या आर्थिक अनियमिततेची मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे बेस्ट प्रशासन आणि 'चलो ॲप' कंपनी यांच्यातील आर्थिक व्यवहार चर्चेत आले आहेत.

बेस्ट बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तिकीट काढताना सुट्ट्या पैशांवरून होणारे वाद टाळता यावेत, तसेच तिकीट वितरणाची प्रक्रिया सुलभ व्हावी, या उद्देशाने 'चलो ॲप' सेवा सुरू करण्यात आली. विशेषतः करोना काळानंतर रोख व्यवहार कमी करण्याच्या दृष्टीने डिजिटल तिकीट व्यवस्थेला प्रोत्साहन देण्यात आले. या ॲपमुळे प्रवाशांना मोबाइलवरून तिकीट काढणे शक्य झाले.

### कराराला मुदतवाढ नको!

बेस्ट उपक्रमाची आर्थिक स्थिती, बससेवेवरील खर्च आणि प्रवाशांना पुरवण्यात येणाऱ्या सुविधांचा विचार करता, डिजिटल तिकीट व्यवस्थेवरील खर्चाची पारदर्शकता आवश्यक असल्याचे अजय सिंह यांनी म्हटले आहे. 'चलो ॲप' कंपनीसोबतच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करून देयक निश्चित करण्याची पद्धत स्पष्ट करावी, अशी त्यांची मागणी आहे. तसेच कंपनीला कराराची मुदतवाढ देऊ नये आणि बेस्टने स्वतःचे अधिकृत मोबाइल ॲप विकसित करावे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

# 'एमपीएससी'कडून भरती प्रक्रिया रद्द

## भाषा उपसंचालक पदाची जाहिरात मागे

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) औषध निरीक्षक पदाची परीक्षा रद्द केल्यानंतर आता आणखी एका भरती प्रक्रियेला स्थगिती देत संबंधित जाहिरात मागे घेतली आहे.

आयोगाच्या अधिकृत प्रसिद्धिपत्रकानुसार, भाषा संचालनालयातील भाषा उपसंचालक (भाषांतर व परिभाषा), गट-ब या पदासाठीची जाहिरात रद्द केली. भरती नियमांमध्ये सुधारणा करण्याबाबत राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाने दिलेल्या स्पष्ट निर्देशांनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना योमर्यादेत सवलत देणे, या बाबींचा समावेश आहे.

एमपीएससीच्या परीक्षा आणि भरती प्रक्रियांबाबत अलीकडच्या काळात घडामोडींना वेग आला आहे. प्रश्नपत्रिका फुटल्याच्या गंभीर आरोपांनंतर आयोगाने यापूर्वी औषध निरीक्षक पदाची भरती परीक्षा रद्द केली होती. याशिवाय, अन्य महत्त्वाच्या परीक्षांबाबतही सध्या चौकशी सुरू आहे. या चौकशीत गैरप्रकार सिद्ध झाल्यास संबंधित परीक्षाही रद्द होण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. मात्र, प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणांपेक्षा वेगळे असलेले भाषा उपसंचालक पदाच्या भरतीचे हे प्रकरण प्रशासकीय कारणांमुळे उद्भवले आहे.

# मुंबईत दर तासाला १७ जणांना कुत्र्यांचा चावा

## २०२१ च्या तुलनेत जवळपास दुप्पट

**अमित श्रीवास्तव/मुंबई**

शहरात २०२५ मध्ये दर तासाला जवळपास १७ जणांना कुत्र्यांनी चावल्याचे उघड झाले आहेत. २०२१ मधील दराच्या तुलनेत हे प्रमाण जवळपास दुप्पट आहे. त्यामुळे भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या परिणामकारकतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

माहितीच्या अधिकारांतर्गत (आरटीआय) आरोग्य कार्यकर्ते चेतन कोठारी यांनी मिळविलेल्या पाच वर्षांच्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी मुंबईत कुत्रा चावल्याच्या १,५४,०१७ घटनांची नोंद झाली. गेल्या पाच वर्षांतील हा सर्वाधिक वार्षिक आकडा आहे.

आरटीआयच्या उत्तरानुसार, २०२१ मध्ये मुंबईत कुत्रा चावल्याच्या ७९,२५२ घटनांची नोंद झाली होती. म्हणजेच दररोज सरासरी २१७, तर दर तासाला सुमारे नऊ जणांना कुत्र्यांनी चावा घेतला होता. २०२२ मध्ये ही संख्या वाढून १,०६,७९७ झाली. त्यानंतर २०२३ मध्ये ती घटून ६१,३३२ वर आली. मात्र, २०२४ मध्ये घटनांची संख्या पुन्हा वाढून १,२८,२५२ झाली, तर २०२५ मध्ये ती आणखी वाढून १,५४,०१७ वर पोहोचली. यानुसार, २०२५ मध्ये दररोज सरासरी ४२१ जणांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद झाली.

पाच वर्षांत मुंबईत कुत्रा चावल्याच्या एकूण ५,२९,६५० घटनांची नोंद झाली. म्हणजेच दररोज सरासरी २९० घटना घडल्या. २०२३ मध्ये घटनांमध्ये घट झाल्यानंतर २०२४ आणि २०२५ मध्ये झालेली तीव्र वाढ चिंताजनक आहे.

आरटीआयच्या उत्तरात मुंबईत कुत्रा चावल्यामुळे किंवा कुत्रा चावल्यानंतर रेबीज झाल्यामुळे कोणत्याही मृत्यूची नोंद नसल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, कुत्रा चावण्याच्या घटनांची मोठी संख्या पाहता निर्बीजीकरण आणि लसीकरणाच्या उपाययोजना या समस्येच्या वाढत्या प्रमाणाशी सुसंगत आहेत का, याचा आढावा घेण्याची गरज व्यक्त होत आहे.



### रेबीज लसींचा तुटवडा

कुत्रा चावण्याच्या घटनांमध्ये झालेली मोठी वाढ आणि रेबीज प्रतिबंधक लसींच्या तुटवड्याबाबत समोर येणाऱ्या वृत्तांबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. "मुंबईत कुत्रा चावण्याच्या घटनांमध्ये अनेक पटींनी वाढ झाली आहे, ही चिंतेची बाब आहे. त्याचबरोबर रेबीज प्रतिबंधक लसींचा तुटवडा असल्याच्या बातम्याही वारंवार समोर येत आहेत.

# पत्रकारांवरील हल्ले रोखण्यासाठी संरक्षण कायद्याची गरज - आठवले

**जयपूर :** पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून, पत्रकारांवरील हल्ले रोखण्यासाठी देशातील सर्व राज्यांनी पत्रकार संरक्षण कायदा लागू करावा. यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी केले.

जयपूर येथील पिंक सिटी प्रेस क्लबच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. राजस्थानच्या उपमुख्यमंत्री दिया कुमारी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष खासदार मदन राठोड, आमदार गोपाळ शर्मा, प्रेस क्लबचे अध्यक्ष मुकेश वीणा आणि महासचिव राजकुमार शर्मा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

आठवले म्हणाले की, आपणही 'भूमिका' नावाचे साप्ताहिक वृत्तपत्र चालविले असून, पत्रकार म्हणून काम केल्याचा अनुभव आहे. पत्रकारांनी आपली भाषणे, मोर्चे आणि विविध कार्यक्रमांच्या बातम्या लोकांपर्यंत पोहोचविल्या. त्यामुळे आपले नेतृत्व उभे राहण्यास पत्रकारांचे योगदान लाभले. बातम्यांमुळे दुखावलेल्या व्यक्तींनी पत्रकारांवर हल्ले करण्याऐवजी विचारांना विचारांनी उत्तर द्यावे.

पत्रकारांवरील हल्ले लोकशाहीसाठी घातक असून, त्यांना संरक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व राज्य सरकारांनी पत्रकार संरक्षण कायदा लागू करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात अनेक मान्यवर पत्रकारांना रामदास आठवले यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रिपब्लिकन पक्षाचे राजस्थान प्रदेशाध्यक्ष राधामोहन सैनी, राष्ट्रीय सचिव प्रतिमा तोतला, नवरतन गुसाईवाल आणि अमरवीर सिंह यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पिंक सिटी प्रेस क्लबची स्थापना १९९२ मध्ये प्रवीणचंद धावडा यांनी केली होती.

# गोकुळच्या दूध उत्पादकांना न्याय मिळू दे!

## आमदार सतेज पाटील यांचे नूतन संचालकांसह साकडे

**कोल्हापूर :** गोकुळ दूध संघाच्या साडेपाच लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त न्याय मिळू दे, असे साकडे काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी आप्पाचीवाडी येथील हालसिद्धनाथाला घातले. यावेळी गोकुळ दूध संघाच्या नूतन संचालक मंडळाने देवस्थानाचे दर्शन घेतले. आप्पाचीवाडी ग्रामस्थांच्या वतीने आमदार सतेज पाटील आणि नूतन संचालकांचा सत्कार करण्यात आला.

हालसिद्धनाथाच्या आशीर्वादाने गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत १३ संचालक निवडून आल्याबद्दल सतेज पाटील यांनी जिल्ह्यातील ठरावधारक आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त केली.



पाटील म्हणाले, "गोकुळ दूध संघाच्या माध्यमातून जे-जे चांगले करता येईल, ते करण्याचा आमचा प्रयत्न राहील. गोकुळचे नाव केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशात उंचावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

ठरावधारक आणि साडेपाच लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त न्याय मिळवून देण्यासाठीच आम्ही हालसिद्धनाथाच्या चरणी साकडे घातले."

यावेळी नूतन संचालक शशिकांत पाटील (चुयेकर), शशिकांत खोत, राजूबाबा आवळे, अभिजित तायशेटे, प्रा. किसन चौगले, बाबासाहेब देवकर, आणि भाग्यश्री डोंगळे उपस्थित होते. तसेच बाबुराव खोत, तानशेंद खोत यांच्यासह ग्रामस्थ आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'पुन्हा नक्की भेटू'मधून नात्यांची अनोखी गोष्ट



**मुंबई :** काही जोड्या सहज जुळतात, तर काहींची गाठ पडण्यासाठी खास योग जुळून यावा लागतो. असाच अनोखा योग 'पुन्हा नक्की भेटू' या नाटकाच्या निमित्ताने जुळून आला आहे. मुक्ता बर्वे-प्रियदर्शन जाधव आणि आरती वडगबाळकर-अंशुमन विचारे या कलाकारांच्या जोड्या पहिल्यांदाच एकत्र आल्या आहेत. २३ ऑक्टोबरपासून हे नाटक प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे.

'रंगमाया' आणि 'अष्टविनायक' या संस्थांची निर्मिती असलेल्या या नाटकाचे लेखन देबू बर्वे यांनी केले असून, दिग्दर्शनाची धुरा मीरा वेलणकर यांनी सांभाळली आहे. मुक्ता बर्वे, मीरा वेलणकर आणि दिलीप जाधव हे नाटकाचे निर्माते आहेत.

# सामाजिक अनिष्ट प्रथा, विभाजनकारी शक्तींविरुद्ध एकत्रित येण्याची गरज

## पंतप्रधानांचे आवाहन

**नवी दिल्ली :** देशापुढील आव्हाने आणि बदलत्या काळातील सामाजिक अनिष्ठ प्रथांवर प्रकाश टाकत या समस्यांवर मात करण्यासाठी समाजकंटक व विभाजनकारी शक्तींविरुद्ध एकत्र येण्यासाठी आणि नागरिकांना आत्मनिर्भरतेसाठी प्रेरित करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी येथे केले.

चिन्मय मिशनच्या ७५ वर्षांच्यापूर्तीनिमित्त आयोजित 'चिन्मय अमृत महोत्सव जागतिक संमेलनाचे' उद्घाटन करताना मोदी बोलत होते. वेदान्त आणि भगवद्गीतेचे ज्ञान स र्व स म ान्य ंप य ंत पोहोचवण्यासाठी जागतिक आध्यात्मिक चळवळ उभारणारे चिन्मय मिशनचे संस्थापक स्वामी चिन्मयंद यांच्या विचारांना पुढे नेत, आपण गेल्या २५ वर्षांपासून शासनाचे प्रमुख म्हणून देशसेवा करत असल्याचे त्यांनी सांगितले.

### 'होलोटेक'चा अनुभव

२०४७ मध्ये जेव्हा देश स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण करेल, तेव्हा चिन्मय मिशनही आपला शताब्दीपूर्ती सोहळा साजरा करेल. त्यामुळे विकसित भारताची आणि चिन्मय मिशनची उद्दिष्टे एकच असून हा प्रवास आपल्याला एकत्र मिळून पुढे न्यायचा आहे. या तीन दिवसीय संमेलनात भारत आणि परदेशातून ९,००० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. कार्यक्रमादरम्यान पंतप्रधानांनी स्वामी चिन्मयंद यांच्या 'होलोटॉप'द्वारे त्यांच्याशी संवाद साधला.

**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांस कळविण्यात येते की गांव मौजे मालोंडे, तालुका वसई, जिल्हा पालघर, येथिल सि.स.नं.८६/पर्डी नं. ९६ पै, क्षेत्रफळ ८१.१० चौ. मीटर आणि सि. स.नं.८७, क्षेत्रफळ १७९.८० चौ. मीटर ही जमिन मिळकत श्री. गिरीश प्यारेलाल सोडी (सोढी) यांचे मालकीची आहे. सदर मिळकतीसंदर्भात विकासक मे. डेलिक्झ इन्फ्रा तर्फे प्रोप्रायटर श्री. कुतुबुद्दीन सय्यद मंडल हे वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडे बांधकाम परवानगीकरीता अर्ज दाखल करणार आहेत. तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमांचा विक्री, गहाणवट, बक्षीसपत्र, दान, दावा, वहिवाट, कुळ, भाडेपट्टा, वगैरे हक्काने एखादा बोजा असल्यास तो त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह निम्नलिखित स्वाक्षरीकारांना २०१, यशोदा, पांडुरंग संकुल, पारनाका, वसई (प.), ता. वसई, जि. पालघर ४०१२०१, या पत्त्यावर कळवावा, नपेक्षा सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारे हक्क नाही व तो असल्यास सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

वसई **स्वाती ग. देसाई**
ता.: २४.१०.२०२६ **(विकासकांचे वकील)**

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बँक

**ॲसेट रिकव्हरी शाखा:-** नवी मुंबई दुकान क्र. जी-९ आणि १०, लोकमान्य टिळक, शॉपिंग सेंटर, प्लॉट क्र. ८, सेक्टर-१ वाशी, नवी मुंबई-४००७०३
**ई-मेल :** brmgr2259@mahabank.co.in
bom2259@mahabank.co.in
**दूरध्वनी :** ०२२-२०८७५५०३

**कब्जा सूचना** कायद्यांतर्गत परिशिष्ट ४ - नियम ८(१)

**एजे९१/सरफेसी/कब्जा सूचना/२०२६-२७** **दिनांक: १६/१०/२०२६**

**ज्याअर्थी,** निम्नस्वाक्षरीकारांनी **बँक ऑफ महाराष्ट्रचे** प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचता आणि १३ (१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **२६/०५/२०२५** रोजी मागणी सूचना जारी करून **मे. सचिन टेक्सटाइल्स, सौ. विद्या कन्हैयालाल सैनी (कर्जदार)** यांना सदर सूचनेत नमूद केलेली दिनांक **२६.०५.२०२५** पासूनची **रु. ३,१६,०३,५७३.४३/- (रुपये तीन करोड सोळा लाख तीन हजार पाचशे त्र्याहत्तर आणि त्रेचाळीस पैसे मात्र)** इतकी रक्कम, त्यावरील करारानुसार निर्धारित व्याजदराने व्याज तसेच अनुषंगिक खर्च, व्यय, शुल्क, झालेले/होणारे खर्च यांसह सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परतफेड करण्यास सांगितले होते.

कर्जदारांनी थकीत रकमेची परतफेड करण्यात कसूर केल्यामुळे, कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, ठाणे येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी-०९, ठाणे, जिल्हा ठाणे यांच्या न्यायालयाने जारी केलेल्या दिनांक **०३/०१/२०२६** रोजीच्या फौजदारी विविध अर्ज क्र. ४५१६/२०२५ नुसार, तहसीलदार ठाणे/तलाठी यांनी सदर अधिनियमाच्या कलम १३(४) सह वाचण्यात येणाऱ्या सदर नियमांच्या नियम ८ अंतर्गत त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **१६ ऑक्टोबर २०२६** रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **प्रत्यक्ष कब्जा** घेतला आहे.

विशेषतः कर्जदा आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तांबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तांबाबत केलेला कोणताही व्यवहार वर नमूद रकमेकरिता बँक ऑफ महाराष्ट्रच्या भारास अधीन राहील.

तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत ॲक्टचे कलम १३ चे उप-कलम (८) च्या तरतुदींनुसार कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

बँकेकडे गहाण ठेवलेल्या आणि बँकेने कब्जा घेतलेल्या मिळकतीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे : **गाळा क्र. ०२, तळमजला, राज कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र. ५ए आणि ५सी, सर्व्हे क्र. १०/२, गौरीपाडा, भिवंडी, ठाणे ४२१३०३.**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी आणि मुख्य व्यवस्थापक**
**ॲसेट रिकव्हरी शाखा, नवी मुंबई**

ONIDA
OWNER'S PRIDE

**ओनिडा इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड**

**(पूर्वीची मिर्क इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड म्हणून ज्ञात)**
**नोंदणीकृत कार्यालय :** ओनिडा हाऊस, जी- १, एमआयडीसी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पू.), मुंबई - ४०० ०९३. **सीआयएन नं. :** L32300MH1981PLC023637
**ई-मेल आयडी :** investors@onida.com **वेबसाइट :** www.onida.com **दूरध्वनी क्र. :** ०२२-६६९७५७७७

**भागधारकांना सूचना**
**कागदोपत्री स्वरूपातील शेअर्सचे हस्तांतरण व डीमटेरियलायझेशन (डीमॅट) करिता स्पेशल विन्डो**

सेबी परिपत्रक क्र. एचओ/३८/१३/११ (२)२०२६-एमआयआरएसडी - पीओडी/आय/३७५०/२०२६, दि. ३०.०१.२०२६ च्या अनुषंगाने कृपया नोंद घ्यावी की, दि. ०१.०४.२०१९ पूर्वी विक्री/खरेदी करण्यात आलेल्या कागदोपत्री स्वरूपातील शेअर्सचे हस्तांतरण व डीमटेरियलायझेशनकरिताची स्पेशल विन्डो दि. ०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत खुली राहील.

ज्या भागधारकांनी दि. ०१.०४.२०१९ पूर्वी शेअर्स खरेदी केले होते व हस्तांतरणाकरिता शेअर्स दाखल केलेले नव्हते किंवा हस्तांतरणाकरिता दाखल केले होते, परंतु दस्तावेज/प्रक्रियेतील कमतरता /वा अन्य कारणास्तव रद्द झाले होते/परत आले होते / दुर्लक्षित राहिले होते ते शेअर्स दि. ०५.०२.२०२६ ते दि. ०४.०२.२०२७ पर्यंतच्या १२ महिन्यांच्या कालावधीत हस्तांतरणाकरिता दाखल / पुन्हा दाखल करता येऊ शकतील.

सदर संधी प्राप्त करण्याकरिता कृपया कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट अर्थात एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सी - १०१, एम्बॅसी, २४७ पार्क, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०० ०८३ येथील कार्यालयाशी संपर्क साधावा.

शेअर्स हस्तांतरण विनंती मंजूर झाल्यास, शेअर्स केवळ डीमॅट स्वरूपातच वितरीत करण्यात येतील. अशा हस्तांतरण - तथा - डीमॅट विनंतीकरिता विधिसंगत प्रक्रिया अनुसरली जाईल.

पुढील माहितीकरिता investors@onida.com येथे ई-मेल पाठवावा.

**ओनिडा इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड करिता**
**(पूर्वीची मिर्क इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड म्हणून ज्ञात)**
**सही/-**
**ठिकाण : मुंबई** **प्रसाद ओक**
**दिनांक : २२.१०.२०२६** **उपाध्यक्ष-विधि, कॉर्पोरेट कामकाज व कंपनी सचिव**

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचित करण्यात येते की, आमच्या अशिलांच्या सूचनेनुसार, आम्ही रूम क्र. ६, शिवलीला सोसायटी, टिळक रोड, कारवा हॉस्पिटलजवळ, डोंबिवली पूर्व, महाराष्ट्र ४२१२०१ येथे पत्ता असलेल्या **भावना मयूर रावल** यांच्या खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जागेवरील मालकी हक्काची चौकशी करीत आहोत.

खाली नमूद केलेल्या जागेच्या संदर्भात कोणत्याही करार, विक्री, हस्तांतरण, गहाण, प्रभार, धारणाधिकार, भार, भेट, मृत्युपत्रीय दान, हक्कमुक्तता, विनिमय, सुखाधिकार, हक्क, करारबंध आणि अट, भाडेकरार, वास्तव्याचा हक्क, अभिहस्तांकन, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, लीव्ह अँड लायसन्स, भागीदारी विलेख, कर्जे, वापर, कब्जा, वाटणी, न्यास, वारसा, थकबाकी कर आणि/किंवा आकारण्या, जावक रक्कम आणि देखभाल, जप्ती, मनाई आदेश, हुकूमनामा, आदेश, निवाडा, प्रलंबित वाद आणि/किंवा मूळ दस्तऐवज त्यांच्या ताब्यात असल्याच्या आधारे किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे आणि कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा, मागणी, हिस्सा, हक्क, मालकी हक्क आणि/किंवा हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी या सूचनेच्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत, दस्तऐवजी पुराव्यांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह, खाली सही करणाऱ्यांना, ज्यांचे कार्यालय २ रा मजला, भाग्योदय बिल्डिंग, ७९, नगिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई-४०० ०२३ येथे आहे, त्याबाबत लेखी स्वरूपात कळवावे, अन्यथा अशा कोणत्याही दाव्याचा/दाव्यांचा, असल्यास, संदर्भ न घेता चौकशी पूर्ण करण्यात येईल आणि असे दावे त्याग केलेले मानले जातील.

**वर संदर्भित परिशिष्ट:**

"मुनिधारा "बी" प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड" यांनी शेअर प्रमाणपत्र क्र. ०१३ अंतर्गत जारी केलेले, प्रत्येकी रु. ५०/- (रुपये पन्नास फक्त) मूल्याचे, शेअर अनुक्रमांक १२१ ते १३० (दोन्ही समाविष्ट) धारण करणारे १० (दहा) पूर्णतः भरणा केलेले शेअर्स, तसेच सदर शेअर्सच्या मालकीतून उद्भवणाऱ्या अनुषंगिक लाभांसह, ज्यामध्ये सोसायटीकडून एमडी-आर२-१०१ म्हणूनही संदर्भित असलेला, क्र. १०१ धारण करणारा, क्षेत्र मोजमापीत सुमारे २१८० चौ. फूट चटई क्षेत्र म्हणजेच २०२.५५ चौ. मीटर्स चटई क्षेत्र असलेला आरसीसी गोडाऊन गाळा वापरण्याचा, वास्तव्य करण्याचा, कब्जात ठेवण्याचा आणि उपभोग घेण्याचा हक्क समाविष्ट आहे, जो सर्व्हे क्र. ११९, हिस्सा क्र. १४ धारण करणाऱ्या जमिनीवर बांधलेल्या "मुनिसुव्रत कॉम्प्लेक्स" येथील "आर २" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या १ ला मजल्यावर असून, मौजे राहनाळ, तालुका भिवंडी, ग्रामपंचायत राहनाळच्या हद्दीत, तालुका भिवंडीच्या उप-नोंदणी आणि जिल्हा व विभाग ठाणेच्या नोंदणी हद्दीत स्थित आहे.

**आपला नम्र,**
**मे. मार्कंड गांधी अँड कं. करिता**
दिनांक २४ ऑक्टोबर, २०२६
**(सत्येन वोरा)**
**भागीदार**
**ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर्स**

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
A Government of India Undertaking

**[Rule - 8 (1)]**
**ताबा नोटीस**
**(फक्त स्थावर मालमत्तेसाठी)**

**भुसावळ शाखा**
**पत्ता-** सीटीएस नं. ३२९२, सुख निकेतन, टिंबर मार्केट, सर्वोदय छात्रालयाच्या समोर, जि. जळगांव, महाराष्ट्र-४२५२०१

ज्याअर्थी
खालील सही करणार **युनियन बँक ऑफ इंडिया, भुसावळ शाखा, पत्ता- सीटीएस नं. ३२९२, सुख निकेतन, टिंबर मार्केट, सर्वोदय छात्रालयाच्या समोर, जि. जळगांव, महाराष्ट्र-४२५२०१** चे अधिकृत अधिकारी यांनी सिक्यूरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट (सेकण्ड) ॲक्ट २००२ (२००२ चा कायदा नं. ५४) कायदा आणि कलम १३(१२) अन्वये नियम ३ सह वाचता प्राप्त अधिकाराचा वापर करून सिक्युरिटी इंटरेस्टच्या (एन्फोर्समेंट) नियम २००२ नुसार **दि. १४/१२/२०१८** ला मागणी सूचना केली होती. **कर्जदारः मेसर्स विराज कन्स्ट्रक्शन्स (भागीदार श्री. संजय माणकचंद कोटेचा व सौ. वंदना एस. कोटेचा आणि जामीनदारः श्री. अनिल व्ही. कोटेचा, सौ. शिल्पा अनिल कोटेचा आणि सौ. शिल्पा दिलीप मेहेता)** यांना कर्जाची रक्कम **रू. ९,१६,९६,५९४.६४ (अक्षरी रू. नऊ कोटी सोळा लाख शह्याण्णव हजार पाचशे चौऱ्याण्णव व पैसे चौसष्ट फक्त)** असे मागणी नोटीस दिल्याचे तारखेपासून ६० दिवसांचे आत भरण्यास सांगितले होते.

कर्जदार हे वरील रक्कम परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने कर्जदार आणि तमाम जनतेला सदरच्या नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, खालील सही करणार अधिकृत अधिकारी यांनी कलम १३(४) नियम ८ च्या अधिनियमासह त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील नमूद मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा २२ ऑक्टोबर २०२६** रोजी घेतला आहे.

कर्जदार आणि तमाम जनतेला सूचित करण्यात येते की, खालील मालमत्तेबाबत कोणीही व्यवहार करू नयेत. केल्यास ते वरील थकीत रक्कम **रू. ९,१६,९६,५९४.६४ (अक्षरी रू. नऊ कोटी सोळा लाख शह्याण्णव हजार पाचशे चौऱ्याण्णव व पैसे चौसष्ट फक्त)** असे **युनियन बँक ऑफ इंडिया** यांना देण्यास बांधील राहतील.

**- स्थावर मालमत्तेचे वर्णन -**

**खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचे गहाणः**
स.नं.७४४/ए/२/१+२/१, अनमोल नयनतारा इस्टेट, इमारत-सी, तिसरा मजला, फ्लॅट क्र.५, त्र्यंबक रोडजवळ, सारडा सिटी मॉलजवळ, संभाजी चौक, दंतेवाडी रोड, ता.व जि. नाशिक या मालमत्तेचे एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ २०६.५९ स्क्वे.मी. असून, फ्लॅटच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत. **पूर्वः** फ्लॅट क्र.सी-६, **पश्चिमः** मोकळी जागा, **उत्तरः** मोकळी जागा, **दक्षिणः** मोकळी जागा

सही/-
**दिनांक : २२.१०.२०२६** **मुख्य व्यवस्थापक /अधिकृत अधिकारी**
**ठिकाण : नाशिक** [टिपः स्वैर भाषांतर, तफावत असल्यास इंग्रजी ग्राह्य.] **युनियन बँक ऑफ इंडिया**